आदिवासी साहित्य, संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक

ISSN 2319-6033



# फडकी

(मासिक)

१५ जानेवारी ते मार्च २०२३

वर्ष-१६ वे, अंक २ ते ४

किंमत रू. १००/-

पृष्ठे - १०४



मुख्य संपादक -
डॉ. संजय लोहकरे

सहसंपादक -
डॉ. मारूती आढळ डॉ. सोनू लांडे

उप संपादक -
प्रा. रामदास गिळंदे मा. संजय इदे

कार्यकारी संपादक -
प्रा. चिंतामण धिंदळे डॉ. सुनील घनकुटे

प्रसिद्धी -
देवराम आढळ सुनील फलके
पंकज इरनक डॉ. विष्णू बोरसे

संपादक मंडळ -
तुकाराम धांडे कृष्णा साबळे
कैलास धिंदळे देवदत्त चौधरी
अभिजित करवंदे सीता भोजने
मेजर विठ्ठल बांगर रोहिदास डगळे
रोशन जांबू अभिमन्यू दारसिंबे

अक्षरजुळवणी -
सरिता ग्राफिक्स ॲण्ड प्रिंटर्स,
अमरावती

प्रकाशन स्थळ / पत्र व्यवहार -
संपादक - डॉ. संजय यशवंत लोहकरे
निरगुडेवाडी (विठे) ४२२ ६०४
ता. अकोले, जि.अहमदनगर
संपर्क: ९६५७५४९०७६, ९४०४९७९६८३
ई-मेल : phadki@rediffmail.com

(मासिकातील लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही)

## सभासद होण्यासाठी आवाहन

**वर्गणीचे दर**

वार्षिक :- 300रू.
दशवार्षिक :- 2500 रू.
आजिव :- 5000 रू.

संपादकीय पत्त्यावर मनीऑर्डर,
चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'फडकी' (Fadaki) या नावाने चेक / डिमांड
ड्राफ्ट असावा.

**बँक ट्रान्फसरने वर्गणी भरण्यासाठी तपशील**

बँक ऑफ महाराष्ट्र शाखा,
अकोले, जि. अहमदनगर
बचत खात्याचे नाव :- फडकी (Fadaki)
बचत खाते क्र. :- 60307966854
IFSC Code :- MAHB0001641
MICR No. :- 422014502

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कोकणांची होळी : एक रंगोत्सव, एक लोकोत्सव | –प्राचार्य डॉ. मोतीराम रावजी देशमुख | ०५ |
| २) | आदिवासी दुबळांचा होळी उत्सव | –डॉ. सुनील गणपत घनकुटे | १५ |
| ३) | होली : कोरकू जनजाति का पंचम दिवसीय पर्व | –रोशन जांबू | २० |
| ४) | चाळीसगाव डांगाणातील होळी | –प्रा. यशवंत ढवळा भांडकोळी | २४ |
| ५) | पारधी समाजातील होळी (शिम्गो) | –प्रकाश रामभाऊ चव्हाण | ३६ |
| ६) | होळी : संत एकनाथ | | ४० |
| ७) | बंजारा होळी : एक सांस्कृतिक ठेवा | –डॉ. विजय जाधव | ४१ |
| ८) | आदिवासी संस्कृती आणि परंपरेचा वारसा : होळी | –डॉ. रूपेश कोडीलकर | ४५ |
| ९) | बंजारा लेंगी (होळी गीत) | –संगीता मसराम | ५२ |
| १०) | नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाज, संस्कृती आणि होळी उत्सव | –डॉ. वैजनाथ सोपान अनमुलवाड | ५३ |
| ११) | होळी : संत एकनाथ / संत तुकाराम | | ५९ |
| १२) | आदिवासी कातकरींचा होळी उत्सव | –प्रा. सुभाष लहू शेलार | ६० |
| १३) | सातपुड्यातील होळी उत्सव | –टी. पी. पावरा | ६३ |
| १४) | पूनल सावरी सिमगा पंडूम | –रामचंद्र काटेंगे | ६६ |
| १५) | आगरातील होळी | –प्रा. चिंतामण धिंदळे | ६९ |
| १६) | गोमंतकातील शिमगा : एक समृद्ध लोकसंचित | –प्रा. विनायक बापट | ७६ |
| १७) | ठाकर आदिवासींचा शिमगा | –डॉ. मारूती आढळ, मंगल आढळ | ८० |
| १८) | फागुन | –रोशन जांबू | ८५ |
| १९) | डांगची होळी | –प्रा. एकनाथ आहेर | ८६ |
| २०) | धनगरांची होळी | –विक्रम उत्तम धायगुडे | ९२ |
| २१) | होळी गीते : संकलन | –विजया सोनार | ९६ |
| | | –मिथून ऐ. पावरा | ९७ |
| | | –रामगोपाल भिलावेकर | ९९ |
| | | –कवी देवदत्त चौधरी | १०० |
| | | –भोरु श्रावणा भांगरे | १०१ |
| | | –कृष्णा उल्हा गांगड | १०१ |
| | | –प्रा. डॉ. भगवान जे. साबळे | १०२ |

# गोमंतकातील शिमगा : एक समृद्ध लोकसंचित

प्रा. विनायक बापट

शबयऽऽऽ शबयऽऽऽ शबयऽऽऽ हे शब्द ऐकले की सामान्य गोविकाराचे पाय अगदी साहजिकपणे ताल धरतातः कारण ढोलाचा गजर सुरू झालेला असतो आणि शिमग्याचे रोंबट ऐन रंगात आलेले असते. भारतीय संस्कृतीला विविध सणांची एक समृद्ध परंपरा आहे, किंबहुना ही उत्सव संस्कृतीच संपूर्ण भारताचे एकात्म दर्शन घडवते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. संपूर्ण भारतभर साजरा केला जाणारा एक सण म्हणजे होळी! या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे हा लोकसण आहे, बहुजन समाजाचा सण आहे, बहुजन समाजाच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन आपणाला या सणातून घडते. गोव्यातही हा सण अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. गोव्यात याला 'शिगमा' किंवा 'शिगमों' असे म्हटले जाते.

'भटांच्या मुलांनी शिमग्यात नाचायचं नसतं!' हे वाक्य लहानपणी आम्हाला हिरमुसले करणारे असे. आणि मग दारी आलेल्या रोमटात नाचणाऱ्या लोकांकडे बघत दुधाची तहान ताकावर भागवावी लागत असे. गोवा जरी अगदी छोटंस राज्य असलं तरी या ठिकाणच्या शिमगोत्सवात मात्र वैविध्य आहे. काहीकडे हा सण पाच दिवसांचा असतो, काहीकडे सात दिवसांचा, तर तो काहीकडे अगदी गुढीपाडव्यापर्यंत सुरू असतो. गोव्याच्या काही भागात हा सण फाल्गुन शु. नवमीला सुरू होतो व पौर्णिमेला संपतो. त्याला 'थाकलो शिगमो' असे म्हणतात. पौर्णिमेपासून जो शिमगा सुरू होतो व जो काहीकडे अगदी गुढीपाडव्यापर्यंत साजरा केला जातो त्याला 'व्हडलो शिगमो' असे म्हटले जाते.

शिमग्याच्या पहिल्या दिवशी 'मांड ठेवणे' हा प्रकार असतो. गोव्यातील अनेक लोकोत्सवांमध्ये मांड ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. मांड म्हणजे अशी जागा, ज्या ठिकाणी होळी पुरली जाते किंवा ज्या ठिकाणी शिमग्याचे विधी केले जातात. ही जागा पवित्र मानली जाते. ही जागा शेणाने सारवून घेतली जाते व शुद्ध पाण्याने त्याचे सिंचन करून ती पवित्र केली जाते. त्या ठिकाणी एक समई पेटवून ठेवली जाते. देवाला नारळ ठेवला जातो व हा सण निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून देवाला गाऱ्हाणे घातले जाते. ढोल, ताशे, कासांळे ही वाद्ये या सणात महत्त्वाची आहेत. ही वाद्ये मांडावर आणून ठेवली जातात व त्यांची पूजा केली जाते. यावेळी सर्व देवतांना नमन केले जाते व शिमग्यासाठी त्यांना मांडावर बोलावले जाते.

"असे मांडगुरू गावदेवा देवते नमन बा
मांड देवा देवचारा नमन माझे
असे गावपुसा सातेरी, बेताळा नमन बा,
देवाचे देवपण भुवनी गाजे."


अशा स्वरूपाची ही नमने असतात.

होळी आणणे आणि ती पुरणे हे या सणातील एक महत्त्वाचे कार्य असते. गोव्याच्या विविध भागात वेगवेगळ्या प्रकारच्या होळी आणल्या जातात. काहीकडे सुपारीचे झाड, म्हणजेच जिला माडी म्हणतात ती होळी म्हणून पुरली जाते, तर काहीकडे सरळसोट असे आंब्याचे झाड, जिला आंबुली असे म्हणतात ती तोडून होळीसाठी पुरली जाते. होळी खेळवणे किंवा झुलवणे असाही प्रकार चालतो. होलिका ही प्रल्हादाला जाळून मारण्यासाठी आलेली राक्षसी वृत्तीची बाई असल्यामुळे तिचे प्रतीक म्हणून ही होळी झुलवली जाते व हे करताना ती दुष्ट शक्तीचे प्रतीक असल्याने

तिला शिव्या देणे, अशा प्रकारचा रिवाजही दिसून येतो. काहीकडे पुरण्यासाठी वेगळी व झुलवण्यासाठी वेगळी अशा दोन होळी आणल्या जातात. होळीचे पूजन झाल्यानंतर तिला नारळ अर्पण करण्याची प्रथा आहे. गावातील लोक होळीच्या मांडावर होळीला अर्पण करण्यासाठी नारळ घेऊन येतात. होळीच्या एकूण विधीमध्ये मानपानाला खूप महत्त्व असते. कोणते विधी कोणी करायचे यासंबंधीचे संकेत ठरलेले असतात, मान ठरलेले असतात. तो विधी त्याच जातीतील किंवा घराण्यातील लोक करताना दिसतात. होळीच्या पहिल्या दिवशी फक्त होळीचे पूजन होते व दुसऱ्या दिवशीपासून खऱ्या उत्सवाला सुरुवात होते. अनेक गावात दुसऱ्या दिवशी 'चोर' हा प्रकार असतो. गावातील काही मुलगे तोंडाला काळे फासून, अंगाला विविध झाडांच्या फांद्या (ताळे) बांधून अगदी आदीम प्रकारचे रूप घेऊन गावात सर्वत्र फिरतात.



हे चोर आपल्या घरी आल्यानंतर त्यांना तळी देण्याची प्रथा आहे. त्यामध्ये नारळ, तांदूळ, पैसे असे एका सुपात घालून ठेवले जातात, तसेच नारळाचे तुकडे गुळात घालून ते पण ठेवले जातात. या वेळी केळीचा घड पण दिला जातो. या मुलांसोबत गावचा गावकार व इतर मानकरी असतात. ही चोरांची प्रथा आपणाला आपल्या आदिम संस्कृतीशी जोडून घेण्याचा एक प्रकार आहे. दुसऱ्या दिवसापासून रोंबटे सुरू होतात. अगोदर होळीच्या मांड्यावर रोंबट खेळले जाते व त्यानंतर गावातील विविध घरांत जाऊन त्यांच्या अंगणात रोंबट नाचते. रोंबट म्हणजे नृत्य करणाऱ्या माणसांचा मोठा समूह. काहीकडे त्याला 'मेळ' असेही म्हटले जाते. या रोंबटालाही तळी ठेवली जाते. यावेळी विशिष्ट्यपूर्ण अशी लोकगीते म्हटली जातात. त्यातील एक महत्त्वाचा लोकगीताचा प्रकार म्हणजे 'जत.' 'सोकारती' हा लोकगीताचा प्रकारही काहीकडे म्हणतात. यावेळी राधा-कृष्णाचे नृत्यही सादर केले जाते. तालगडी, गोफ, मोरुलो, चौरंग आदी अनेक लोकनृत्ये या शिमग्याच्या वेळी मांडावर साजरी केली जातात. यातील काही नृत्ये ही शिमग्यात सादर केलीच पाहिजेत अन्यथा देवाचा कोप होतो अशी धारणा आहे. 'रणमाले' हे गोव्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण असे लोकनाट्य आहे. गोव्यातील काही गावांत शिमग्याच्या वेळी हे लोकनाट्य सादर केले जाते. यातून रामकथा सांगितली जाते. गोव्यातील काही गावांत 'करवल्या' हा प्रकार आहे. या करवल्या घेऊन घरोगर फिरले जाते व प्रत्येक घरी त्याचे पूजन होते.



'घोडेमोडणी' हा एक लोकनृत्याचा महत्त्वाचा प्रकार अनेक गावांमधून शिमगोत्सवाच्या वेळी सादर केला जातो. यावेळी घोड्याचे लाकडी सांगाडे कमरेला बांधून, हातात तलवारी घेऊन नृत्य केले जाते. अगोदरच्या काळी शिमग्याच्या दोन दावसात लहान मुली 'गौरीचे बाळ' घेऊन यायच्या. एका वस्त्रात नारळ

बांधून आणला जायचा व या मुली घरोघरी जाऊन

गवरीचें बाळ रड्डा गे


केळें खोबरें मागता गे

अशी गीते म्हणायच्या व गौरीच्या रडणाऱ्या बाळाला शांत करण्यासाठी खाण्याचे पदार्थ आणि पैसे मागायच्या. एकूण शिमग्यात बायकांचा सहभाग म्हणावा तर एवढाच! एरवी गोमंतकीय शिमग्यात बायकांना कोणतेच स्थान नाही. या ठिकाणी आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे, पौष महिन्यात गोव्यातील अनेक गावांत 'धालोत्सव' साजरा केला जातो व या उत्सवात पुरूषांचा कोणताही सहभाग नसतो. मुली गौरीचे बाळ घेऊन यायच्या तर किशोरवयीन मुलगे विविध सोंगे घेऊन यायचे व 'केके' मागायचे.

''आयनाच्या बायना घेतल्या शिवाय वचं ना केंके'' असे म्हणायचे. काही मोठी माणसे ही विविध सोंगे घेऊन यायची. आता हे प्रकार जवळ जवळ बंद झाले आहेत.

'न्हावण' हा गोव्यातील शिमगोत्सवातील आणखी एक महत्त्वाचा प्रकार. शिमग्याच्या शेवटच्या दिवशी हे न्हावण दिले जाते. गावातील जी तळी किंवा जी पारंपरिक पाणथळ जागा आहे त्या ठिकाणी गावचे गावकार बसलेले असतात. लोक त्या ठिकाणी नारळ घेऊन जातात. गावकारी तो नारळ, समोर मोठा टोप असतो त्यात फोडतो. त्या टोपात अगोदरच पाणी असते. नारळाचा शेंडीकडील अर्धा भाग व हे टोपातील तीर्थ येणाऱ्याला दिले जाते. या तीर्थालाच 'न्हावण' म्हणतात. तीर्थ म्हणून ते प्राशन केले जाते. एवढेच नव्हे तर घरातील जे पाळीव पशू आहेत त्यांनाही हे तीर्थ लावले जाते. गावातील ज्या उग्र देवता आहेत त्यांना विविध पशूंचे बळी या शिमग्याच्या वेळी देण्याची प्रथा देखील आहे. हे बळी दिल्याने ज्या अघोरी शक्ती आहेत त्या शांत होतात व वर्षभर गावावर कोणतेही संकट येत नाही अशी लोकांची श्रद्धा आहे.

काही गावांत या शिमगोत्सवाच्या काळात 'गडे' हा प्रकार असतो. देवळाच्या आवारात हे गडे जमतात. गडे म्हणजे देवाचा भार ज्यांच्यावर येतो असे देवाचे सेवक. हे गडे घराण्यांप्रमाणे ठरलेले असतात. संध्याकाळी मांडावर एकत्र येऊन ढोल व इतर वाद्ये जोरजोरात वाजवली जातात. ही वाद्ये वाजू लागली की या गड्यांच्या अंगात दैवी शक्ती संचारते व ते बेफामपणे स्मशानाच्या दिशेने धाऊ लागतात व तेथील प्रेते जाळण्यासाठी वापरलेली व अर्धवट जळलेली लाकडे घेऊन येतात. अगोदरच्या काळी एखादी बाई रजस्वला असताना निधन पावली असेल किंवा बाळंतपणावेळी निधन पावली असेल तर तिला पुरले जात असे. तिचे अवयव हे गडे आणत असत आणि ते जाळले जात असत. अर्थात आता हे प्रकार होत नाहीत. फक्त स्मशानातून लाकडे घेऊन हे गडे येतात व ती होळीकडे जाळली जातात. या गड्यांना देवचार चूड दाखवतो अशी वदंता आहे. त्यामुळे हा उत्सव पाहण्यासाठी असंख्य लोक हा उत्सव ज्या गावात होतो त्या ठिकाणी एकत्र होतात. गोव्यातील सत्तरी तालुक्यातील करंझोळ आणि झर्मे या दोन गावात चोरोत्सव साजरा केला जातो. हा या ठिकाणच्या शिमग्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. या ठिकाणी काही माणसांना खड्डे खणून मानेपर्यंत पुरले जाते, तर काही लोकांना उलटे मान खड्ड्यात घालून पुरले जाते. परंतु त्यांना काही होत नाही. हे उत्सव सुरू होण्यामागे अनेक दंतकथा सांगितल्या जातात.



त्रास देणाऱ्या एका आदिम जमातीचा विश्वासघाताने अंत घडवून आणण्यात आला. त्याची आठवण किंवा स्मृती म्हणून हा सण साजरा केला जातो असे सांगितले जाते. गोव्यातील मळकर्णे या गावी निखाऱ्यांची होळी खेळली जाते त्याला 'शेणी उजो' असे म्हटले जाते. हे ही गोमंतकीय होळीचे एक खास वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. गोव्यातील शिमगोत्सवासंदर्भात नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, गोव्यात गुलाल त्या गावच्या होळीचा ज्या दिवशी शेवटचा दिवस असेल त्या दिवशी खेळला जातो. इतर दिवशी रंग उधळला जात नाही. शहरात मात्र होळी पौर्णिमेलाच गुलाल खेळला जातो.

गोव्यात आज आधुनिक शिमग्याचे रूप पूर्णपणे पालटून गेले आहे. आज गोव्यात सरकारी पातळीवर शिमगोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. विविध शहरांमध्ये या शिमगोत्सवानिमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते व यासाठी लाखो रुपयांची बक्षिसे दिली जातात. या वेळेला विविध चित्ररथ तयार केले जातात, त्याचप्रमाणे अनेक रोमटामेळ पथके यात सहभागी होतात. या आधुनिक शिमग्याचे रूप पारंपरिक शिमग्यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. एका अर्थाने आज शिमगोत्सवाचे बाजारीकरण झाले आहे. अर्थात त्यामुळे या लोककलांचे जतन करण्यात काही प्रमाणात मदत मिळते हे ही तेवढेच खरे. या शिमगोत्सवाच्या मिरवणुका पाहण्यासाठी देशी विदेशी पर्यटकांची या काळात गोव्यात प्रचंड गर्दी होते.

आधुनिक काळात पारंपरिक गोमंतकीय शिमग्याचे रूप पूर्णपणे बदलत आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि लोकांकडे आलेली आर्थिक समृद्धी ही देखील या मागची कारणे आहेत. तसेच अगोदरच्या काळी ज्या श्रद्धा, भय या भावना माणसाच्या मनात वसत होत्या त्या आधुनिक काळात बदलू लागल्याने देखील पारंपरिक शिमगोत्सवाचे रूप बदलू लागले आहे. व त्यामुळे हा पारंपरिक शिमगोत्सव साजरा करण्यासंबंधी लोकांमध्ये एक उदासीनताही दिसून येते. अर्थात काळानुसार हे बदल अपेक्षित आहेत. या शिमगोत्सवात राजकारण शिरल्याने व त्यातून वितंडवाद सुरू झाल्याने आज गोमंतकातील अनेक गावांतील पारंपरिक शिमगोत्सव बंद पडले आहेत ही अत्यंत दुर्दैवी अशी गोष्ट आहे. या शिमगोत्सवामागे खूप मोठे लोकसंचित आहे. लोकसंस्कृतीच्या एका समृद्ध वारशाचे वहन या शिमगोत्सवातून होत असते. आणि हे शिमग्याचे पारंपरिक रूप बदलल्यास हे एवढ्या वर्षाचे लोकसंचित नष्ट होण्याची शक्यता देखील आहे. अर्थात आज या लोककलांचे, लोकसाहित्याचे संकलन करण्याचे प्रयत्नही मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहेत. नवीन पिढीतील काही लोक या सर्वांचे जतन व्हावे म्हणूनही प्रयत्नरत आहेत. त्यामुळे आशेचे किरणही दिसत आहेत. पुढे काय होईल याचे उत्तर काळच देईल, परंतु आजच्या घडीला तरी या उत्सवातील जे अनिष्ट असेल ते दूर करून चांगल्या गोष्टींचे जतन करण्याचे खूप मोठे आव्हान लोकसाहित्य व लोककला यांचे जतन करण्यासाठी जे कार्यरत आहेत त्यांच्यासमोर उभे ठाकले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१) लोकसरिता : गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास - विनायक विष्णू खेडेकर, प्रकाशक: कला अकादमी, पणजी-गोवा.

पणजी-गोवा, ९७६४९७१२५६

***